Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 417 – 426
DOI: 10.5281/zenodo.10130731
Original Research Article

# महात्मा गांधी यांचे सत्याग्रह विचार

प्रा. डॉ. शिवाजी सोमला पवार

संशोधन मार्गदर्शक, इतिहास विभाग, दिगंबरराव बिंदू कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय भोकर जि. नांदेड ४३१८०१ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: shivajipawar552@gmail.com

Received: 14 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

**प्रस्तावना**

21 व्या शतकात आपण पदार्पण केले आहोत. काळाच्या प्रवाहाबरोबर आपल्याला पुढे जायचे आहे, परंतु त्याचबरोबरच आपले पाऊल योग्य दिशेने पडत आहे याची पण काळजी घेणे आवश्यक आहे. आपल्या जीवनातील निष्ठा, ध्येये ही मूल्यांवर आधारित आहेत वा मूल्य विरहित आहेत याचा आपण शांतपणे विचार केला पाहिजे. मूल्यांवर दृढ निष्ठा बाळगणाऱ्या व साधनशुचितेला अन्य महत्व देणाऱ्या गांधीजीना आपण 'महात्मा' व 'राष्ट्रपिता' म्हणतो. भारतीय इतिहासात अनेक वंदनीय वा निंदणीय व्यक्ती होऊन गेल्या आहेत. परंतु एकाच व्यक्तीबद्दल पूज्य भावना व तेवढाच तिरस्कार असणारी व्यक्ती म्हणजे महात्मा गांधी एकीकडे सत्य, अहिंसा, प्रेम, सर्वधर्मसमभाव यांचा उपासक पददलितांचा कैवारी म्हणून संपूर्ण जगात गांधीजींना मानाचे स्थान दिले जाते. गेल्या शतकातील सर्वश्रेष्ठ मानव म्हणून गांधीजींना ओळखले जाते. परंतु इमर्सनने एका ठिकाणी म्हटले आहे, "टुबी ग्रेट,. ईज टुबी मिसअंडरस्टुड" हे म.गांधीच्या बाबतीत शंभर टक्के खरे ठरले. गांधीजीना 'महात्मा' कवींद्र रवीद्रनाथ टागोरांनी म्हटले, तर त्यांना 'राष्ट्रपिता' ही सर्वसामान्य पदवी देशगौरव सुभाषचंद्र बोस यांनी दिली. हिदुस्थान नावाचा देशच नाही असे सर जॉन स्ट्रॅची नावाच्या प्रसिध्द लेखकाने म्हटले होते. त्यानंतर जॉन सीसी या इतिहासकाराने आफ्रिका, युरोप प्रमाणे हिदुस्थान ही भौगोलिक संज्ञा आहे, एक प्रकारचे सांस्कृतिक ऐक्य या देशात होते, पण त्यात सामान्य माणसाची संवेदना सामील नव्हती. राष्ट्रीयत्वाचे मुख्य लक्षण एकमेकाबरोबर राहण्याची फक्त तयारी नव्हे, तर इच्छा आकांक्षा हे आहे. आणि ही भावना महात्मा गांधीच्या उदयानंतर त्यांचा चळवळीमधून, विधायक कार्यक्रंमांमधून जन्माला आली. महात्मा गांधीनी "स्वातंत्र्य' या शब्दाऐवजी 'स्वराज्य' हा शब्द वापरला. स्वातंत्र्य म्हणजे Independence हे वेगळे, आणि Freedom

म्हणजे मुक्ती वेगळी. सर्व प्रकारच्या गुलामगिरीपासून सामान्य माणसाला 'मुक्ती' मिळाली नाही. ही 'मुक्ती' मिळावी म्हणून गांधीनी विधायक कार्यक्रमाची संकल्पना मांडली. गांधीजीच्या मते, "विधायक कार्यक्रम हा पूर्ण स्वराज्य प्राप्त करण्याचा, सत्याचा व अहिंसेचा मार्ग आहे, याची संपूर्ण अंमलबजावणी म्हणजे 'पूर्ण स्वराज्य' होय. सत्य आणि अहिंसात्मक साधनांनी पूर्ण स्वराज्य किंवा संपूर्ण स्वातंत्र्याची रचना करणे, म्हणजे विधायक कार्यक्रम", असे म्हणता येईल. चरखा, झाडू, सामुदायिक प्रार्थना व सत्यागृह उत्पादक शारीरिक परिश्रमाची प्रतिष्ठा मान्य व्हावी.म्हणून गांधीजीनी चरखा हे प्रतीक मानले. 'झाडू' हे सामाजिक विषमता व जात-पात, उच्चंनीच भावना संपविण्याचे साधन होते, तर सामुदायिक प्रार्थना ही परस्परांच्या किंवा एकमेकांच्या भल्यासाठी केलेली प्रार्थना असते.अन्याय व भ्रष्टाचाराला अहिंसक पध्दतीने विरोध करणे हा 'सत्याग्रहाचा' एक भाग आहे.सत्याग्रह हा सत्याचा आग्रह करणारा तर असावाच लागातो. परंतु तो जीवनात 'सत्य-ग्रहण' करणारा 'सत्यग्रही' ही असावा लागतो. सत्याग्रहात अहिंसक Restistance पेक्षाही उचित ध्येय प्राप्तीसाठी इतरांना केलेले Assistance म्हणजे सहयोगाची भावना अधिक असते.

महात्मा गांधीच्या अहिंसेची दोन लक्षणे आहेत, असे ते म्हणत. एक प्रेम व दुसरे पुरुषार्थ! हिंसा न करणे 'अहिंसा' नव्हे! मी जगेन व इतरांनाही जगू देईन हेही पुरेसे नाही.तर मी जगेन व इतरांना जगायला मदत करेन, असे विधायक स्वरुप गांधीच्या अहिंसेचे आहे. आमच्या जवळ शस्त्र नव्हते म्हणून उत्सहीपणा म्हणून गांधीजीनी अहिंसेचा सिध्दात मांडला नाही. तर शस्त्रांची असफलता, निष्कलता व निरर्थकता त्यांनी जाणली. शस्त्रांच्या शर्यतीचे धोके त्यांना माहीत होते. म्हणूनंच त्यांच्या अहिंसेत "मानवता' (Humanity) व पौरुष किंवा मर्दुमकी (Manliness) हे गुण सामावलेले आहेत.गांधीजींचे अर्थविज्ञानही आगळे वेगळे आहे. अर्थविज्ञान, स्वार्थविज्ञान राहू नये अर्थकारण प्रतिपादन केले. "माझे जीवन हा माझा संदेश" आहे, असे गांधीजी म्हटले. म्हणून ते खऱ्या अर्थाने तत्वज्ञान, गांधीवाद नव्हे, तर जीवन-दर्शन आहे.सत्यच 'ईश्वर' आहे. कारण 'सत्यं' हे एकच असू शकते व त्याला धर्म. जात, पंथ, संप्रदाय यात बंदिस्त करुन ठेवता येत नाही. भूतमात्रांच्या व जीवमात्राच्या अस्तित्वाचे अधिष्ठान म्हणजे 'परमसत्य' प्रमादाने अगर मोहवशतेने या धर्मक्षेत्राचे कुरुक्षेत्र होऊ नये. त्यामुळे त्यांनी रंगभेद, वर्णभेद,जातिभेद व अस्पृश्यता यांच्याशी निकाशने लढा दिला.म्हणूनच त्यांना संपूर्ण स्वदेशी न्यायप्रणाली हवी होती. तिचा पोषाख, भाषा व पध्दती संपूर्णत: स्वदेशी असेलच महात्मा गांधीनी सात सामाजिक पापांचा उल्लेख केला आहे.1) सिध्दान्तविहीन राजनीती 2) परिश्रमविहीन धनोपार्जन 3) सदाचारविहीन व्यापार 4) चारित्र्यविहीन ज्ञान 5) विवेकहीन सुख 6) संवेदनाविहीन विज्ञान 7) वैराग्यविहीन उपासना, असा समाज अभिप्रेत होता.गांधीनी 'हरिजन सेवा' असा कार्यक्रम आखला होता.अस्पृश्यांच्या प्रती केलेल्या पापांबद्दल सवर्णांनी अंत:करणापासून पश्चाताप केला पाहिजे.म्हणून त्यांनी अस्पृश्यता निवारणाचा कार्यक्रम हरिजनसेवेच्या रुपात मांडला. ते स्वंत:ला भंगी म्हणून घेत असत. महात्मा गांधीच्या चळवळीत प्रथमत: भारतीय स्त्री घराचा उंबरठा ओलाडून घराबाहेर पडली.मिठाच्या सत्याग्रहाचे नेतृत्वही श्रीमती सरोजिनी नायडू यांनी केले. दारुच्या दुकानांवर पिकेटिंग करण्यात स्त्रियाच आघाडीवर होत्या. महात्मा गांधीचा भर स्त्रीला पुरुषाप्रमाणेच प्रतिष्ठा लाभावी यावर होता. स्त्री-पुरुष समता अगर स्त्री मुक्ती नको होती, तर त्यापुढे जाऊन 'स्त्री शक्ती' चा विकास व्हावा, हे अभिप्रेम

होते. म्हणून त्यांनी 1) सर्व धर्मसमभाव जो संप्रदायिकतेवरील तोडगा होत 2) स्पर्श भावना-जो जातीभेदावरचा उपाय होता 3) शरीर श्रम-जो वर्णभावना संपवून शारिरीक श्रमाची प्रतिष्ठा प्रस्थापित करण्यासाठी होता 4) दारिद्रनारायण जो धनाढयतेच्या व आत्मसंभावितपणाच्या भावनेवरील उतारा होता. आज तर लोकांचा हिंसेवरील विश्वास वाढतो आहे. डोके कापून टाकल्यास माणूस व विचार दोन्ही संपतात. खून गैरसमजांतून केले जातात. म्हणूनच आजही महात्मा व राष्ट्रपिता गांधीना समजून घेण्याची गरज आहे. इंडिया ॲब्रॉड न्यूज सर्व्हिसने, दिलेल्या माहितीनुसार अमेरिकेत न्युजर्सी विधानसभेत गांधीजीच्या अहिंसा विचारांचा विदयाल्यांच्या पाठयक्रमात समावेश असावा म्हणून एक विधेयक आणण्यात येत आहे. युवक व विदयार्थी (Teenagers) यांच्यात वाढत असलेली हिंसक वृत्ती थांबविण्यासाठी गांधीजींच्या अहिंसा विषयक विचाराशिवाय पर्याय नाही. अमेरिकेत गांधीचा अहिंसा-विचार प्रस्थापित झाल्यावर, मग कराचित त्याची आपण भारतात आयात करु कारण कारण आपल्याला ‘इम्पोर्टेड’ वस्तूच अधिक आवडतात व रुचतात म्हणून म. गांधीचे सत्यागृह, अहिंसा, सत्य, असहकार, सविनंय कायदेभंग, ग्रामस्वराज्य, ग्रामउदयोग, शिक्षण या बाबीत विचार मांडले.

महात्मा गांधीजीबद्दल आइनस्टाईनची वाणी अशी की, येणाऱ्या पिठयांचा हयावर क्वचितच विश्वास बसेल की, असाही हाडा-मासांचा एक मनुष्य हया भूतलावर होऊन गेला. दुर्दैवाने खरी ठरली. महात्मा गांधीजींचे विचार हे समजण्यास व आचरणात आणण्यास सहज शक्य आहेत. मानवी दुर्गुणांचे त्यांना पुरेपूर भान होते. अहिंसाला कृतीशीलतेचा एक नवा अर्थ दिला.संत-गांधी व समाजाकारणी-गांधी ही त्यांची दोन वेगवेगळी रुपे नव्हती. ‘मानवता’ हे गांधीजेचे दैवत, वेदांची शिकवण अशी आहे की, आंतरिक सुख व शांतीसाठी मनुष्याची मद, मोह, मत्सर, क्रोध इत्यादी विकारापासून सुटका झाली पाहिजे. त्याऐवजी प्रेम, करुणा, दया, सत्य व न्यायाची ओढ अंगी येण्यासाठी मनुष्यास आंतर व बाहय प्रवृत्तीशी झगडावे लागते. ग्रीक न्यु टेस्टामेंट मध्ये प्रेमाला तीन शब्द आहेत. पहिला आहे Eros आत्म्याची ईश्वराबद्दलची ओढ असा त्याचा मूळ अर्थ पण त्याचारुढ अर्थ आहे श्रृंगारीक प्रेम, दुसरा शब्द आहे Phllia वैयक्तिक मित्रांमधील प्रेम मी त्याच्यावर प्रेम करतो करण तो माझ्यावर प्रेम करतो. असा त्यात भाव असतो.पण आपल्याला विरोध करणाऱ्यावरही प्रेम करणे Agape हया प्रेमाच्या तिसऱ्या शब्दात अभिप्रेत आहे.[2]

“सत्य” हे गांधीजींचे आदय दैवत.अन्याय व अत्याचाराने पीडित अशा जगात गांधीजी सत्य जगले. विचार, आचार व उच्चार यांत अविवेकी असणाऱ्या जगात गांधीजींनी सत्याचा शोध घेतला. गांधीजींच्या मते ईश्वर सत्य म्हणजे राम, नारायण, खुदा, अल्ला, God एका जैन मुनींच्या मते गांधीजी अहिंसेपेक्षा सत्याचे जास्त समर्थक होते. गांधीजींचा हा विचार Cicero व Emerson यांच्याशी मिळता जुळता आहे. मानवता व सत्यं हया मूल्यांसाठी झटण्यास आवश्यक असलेला गुण म्हणजे “सर्वसंगगपरित्याग” होय.[3]

### 1) गांधी विचार मानवांचा आधार

मध्यतरीच्या काळात ज्ञान-विज्ञानामुळे मानवांची भौतिक प्रंगती कौनुकास्पर झाली तरी नैतिक प्रगतीवर भर न दिल्याने ही प्रगती वरदान ठरेल की शाप ठरले ? या पंचवीस-तीस वर्षाच्या काळात कॉम्प्युटर, क्लोनिंग, इंटरनेट, ॲटोमबॉम्ब, यांत्रिक मानव, कृत्रिम उपग्रह, असे शोध लोकांना आश्चर्यचकित करीत असतात त्यांचे परिणाम कसे होतील याबद्दल लोकांना चिंता आहे. सर्व विश्व विज्ञानामुळे जवळ येत असताना मानव मात्र परस्परांपासून दूर जात आहे. भोगबादाच्या आक्रमणामुळे सर्व क्षेत्रात स्वार्थी प्रवृत्तीचा उन्माद होत आहे. दहशतवाद, व्यसनासक्ती, संकूचित जातीभावनेने जातीय संघर्ष, तालिबान विकृती व अस्त्रधारी धनाढय देशाची हुकुमत याचे भीषण परिणाम आपण पहात आहोत. खुल्या स्पंर्धेमुळे व जागतिकीकरणामुळे जगात धनाढय अशा राष्ट्राचे जगावर वर्चस्व आहे व देशादेशांत सत्ताधारी व मत्ताधारी धनदांडग्याचे वर्चस्व आहे.[4] मानव समाजाच्या गंभीर समस्यांची उकल होऊन एकंदरीने सर्वसामान्य माणूस सुखी व्हावा असे राष्ट्रनेत्याचे, राज्यकर्त्याचे व विचारवंताचे जाहीर उद्दिष्ट असतानाही व त्यासाठी विकासाचे काही प्रकल्प होउनही त्या समस्या तशाच कायम आहेत.गांधीजी या विश्वामानवर्शनाचे प्रवर्तक युग पुरुष आहेत म्हणूनच जात, धर्म, पंथ, राष्ट्र इत्यादी भेदभाव मनात न आणता मानवांच्या भवितव्याबद्दल आस्था बाळगणारे सर्व विचारी मानव गांधीजींच्या विचारामुळे प्रभावीत झाले आहेत. जर समाजात हिंसाचार, अत्याचार, भ्रष्टाचार वाढतो आहे आणि अमानुष कृत्येही प्रतिष्ठा पावत आहेत. सत्पुरुष वा वीरपुरुष मानवांच्या कल्याणयात्रेतील महान मार्गदर्शक आहेत. विज्ञानामुळे व औद्योगिक तंत्रज्ञानामुळे भौतिक प्रगती आकर्षक वाटत असली तरी या प्रगतीचा लाभ धनिकवर्गाला व शासनकर्त्यांनाच मुख्यत: झाला आहे. राजकारणत सत्ताबाजी, अर्थकारणात नफेबाजी,समाजकारणात गुंडागिरी, धर्मकारणात जातीवाद आणि एकंदरीने सर्व समाजात असुरक्षितता अनुभवास येत आहे. मानवांची सुरक्षा साधावयाची असेल तर गांधी विचारांची दीशा हाच तरणोपाय आहे. म्हणून राजकीय, आर्थिक, सामाजिक, धार्मिक अशा क्षेत्रातील धोके टाळून त्या-त्या क्षेत्रातून मानवहित कसे साधेल याबद्दल गांधीजींनी जे विचार दिले त्याचा संक्षेपाने परामर्श घेणे श्रेयस्कर ठरेल.[5]

### 2) सत्याग्रंह विचार

पृथ्वी ही सत्याच्या बळावर टिकेलेली आहे. असत्य-म्हणजे 'नाही', सत्-सत्य-म्हणजे 'आहे'. गांधीजी म्हणतात" माझ्या मनाने सत्य हे सर्वश्रेष्ठ आहे आणि त्याच्यांत अगणित गोष्टीचा समावेश होतो.माझा अंतरात्मा जे सत्य मानतो त्या कल्पनेतील सत्यालाच माझा आधार मानून, माझा दोपस्तभ समजून, त्याच्या आसऱ्याने माझे जीवन मी व्यतीत करीत आहे. सत्य हेंच जीवनांचे साध्य, सत्य हाच परमेश्वर, सत्यमय जीवन सत्याचा आग्रह, सत्याचा अविष्कार अहिंसा, साध्य-साधन विचार, सत्याग्रहाचे शस्त्र व शास्त्र, नि:शस्त्र प्रतिकार आणि सायाग्रह, सत्याग्रहाकरिता पात्रता व पथ्ये, सत्याग्रहांत उपवासाचे स्थान, राजकारणांत सत्याग्रह, देशरक्षणाच्या कामी सत्याग्रह, वांशिक भेदभाव व सत्याग्रह,सामाजिक सत्याग्रह,प्रार्थना दिसून येतात.[6]

### 1) सामुदायिक सत्याग्रह

सामुदायिक सविनय कायदेभंग ही उत्सफुर्त क्रिया असते. सामुदायिक सविनय कायदेभंग हा सामुदायिक अहिंसेवाचून व सामुदायिक शिस्तपालनावाचून अश्यक्य आहे. सत्याग्रंहाच्या चळवळीकरीता अहिंसेच्या सिध्दान्तावर पूर्णपणे किंवा अपुर्तेपणे विश्वास ठेवणारे लोकच पाहिजेत असे नाही. लोकांनी अहिंसक लढयाचे नियम अमलात आणले म्हणजे पुरे ओह. सविनय कायदेभंग सामुदायिक असो किंवा व्यक्तिगत असो,तो विध्यक कार्याला सहाय्यरुप असतो. आणि सशस्त्र बंडाचा तो सर्वागपरिपूर्ण असा पर्याय आहे. सशस्त्र बंडाकरिता ग्याप्रमाणे लष्करी शिक्षण आवश्यक आहे, त्याच रीतीने सविनय प्रतिकार करिता विधायक कार्याच्या शिक्षणाची तितकीच आवश्यकता आहे. आणि ग्याप्रमाणे प्रसंग आला तरच सविनय प्रतिकारात वापर हा आवश्यक असतो.[9]

### 2) राजकीय सत्याग्रह

सत्याग्रह हा सत्ता मिळवण्याकरिता होऊच शकत नाही. सत्याग्रह हा सत्तेला निर्मळ करण्याकरिता असतो. सत्ता म्हणजे हिंसाच, सत्ता टिकवण्याकरिता लष्कर लागते. सत्तेचा त्याग हा सत्याग्रहाच्या मुळाशी आहे.असहकार आणि सविनय कायदेभंग या सत्याग्रहवृक्षाचा दोन वेगवेगळया शाखा आहेत. राजकीय असहकाराचा अर्थ मुख्यत्वे जे सरकार असहकार करणाऱ्याच्या मते नीतिभृष्ट झाले आहे त्याच्याशी असलेला आपला सहकार काढूण घेणे. यात उग्रस्वरुपाचा कायदेभंग येत नाही. सविनय कायदेभंग म्हणजे घटनात्मक रित्या मंजुर झालेल्या पण नीतीशी ‘संबंध’ नसलेल्या कायदयांचा भंग त्यायोगे प्रतिकार करणाऱ्याची शिष्टाचारयुक्त म्हणजेच अहिंसक बंडखोरी दर्शवली जाते. सामुदायिक सविनय कायदेभंगाचे अधिष्ठान वेगळया प्रकारचे आहे. तो शांत वातावरण असेल तरच अमलात आणता येतो. ही शांती दुबळेपणतून आलेली नव्हे तर सामर्थ्ययुक्त शांती, अज्ञानातून आलेली नव्हे तर जाणीवयुक्त शांती असली पाहिजे, व्यक्तीने केलेला सविनय कायदेभंग हा प्रतिनिधिक स्वरुपाचा म्हणजे दुसऱ्याकरिता केलेला होऊ शकतो, पुष्कळ वेळा तो तसा असतोही सामुदायिक सविनय कायदेभंग स्वार्थपर असू शकतो. नव्हे पुष्कळ वेळा असतोही सामुदायिक सविनय कायदेभंगात प्रतिकार करणाऱ्यांना त्या सिध्दान्ताची कार्यपध्दती कळलेली असली तरी पुरे असते.[10]

### 3) सत्याग्रहाचे प्रयोग

दक्षिण अफ्रिकेत हिंदी लोकांची सत्याग्रहाची लढाई आठ वर्षे चालली.सत्याग्रह हा शब्द त्या लढाईच्या अनुषंगाने शोधला आणि उपयोगात आणला गेला. मुंबई झालेल्या सभेत गिरमीट बंद करण्याची तारीख 31 जुलै 1917 ठरवणत आली होती. लॉर्ड चेम्सफोर्ड यांनी रौलेट ॲक्ट नंतर चुका करण्यात काही कसर ठेवली नाही. सिव्हिल सर्व्हिसमधील कायम ऑफिसरांच्या पंजातून कोणता व्हायसरॉय शेवटपर्यंत सुटू शकला आहे. लढा चंपारंण्याचा, लढा अमदाबादच्या मिल मजुरांचा, लढा खेडयचा, लढा शैलेट कायदयासंबधीचा, लढा शिलाफत, असे धर्मयुध्द आपोआपच पुढे येते, आणि धर्मनिष्ठा पुरुष त्याकरिता नेहमी तयारच असतो.अगोदरपासून ज्याचा बेत ठरवावा लागतो ते धर्मयुध्द नव्हे.धर्मयुध्द ठरविणारा आणि चालविणारा ईश्वर आहे.ते सुध्दा ईश्वराच्या नावावरच सुरु होऊ शकते आणि जेव्हा सत्याग्रहयाचा

आधार खिळाखिळा होतो. तो गदी शक्तीहीन बनतो, चौफेर अंधारल्या सारखे त्याला वाटू लागते. तेव्हाच त्याला ईश्वर साहाय्य होतो.मनुष्य जेव्हा रज:कणाहूनही स्वत:ला तुच्छमानू लागतो तेव्हाच ईश्वर त्याचा सहायकारी बनतो. विरमगाम जकात प्रकरण-1915 मध्ये झाले.[11]

### 4) चंपारण्य सत्याग्रह

महात्मा गांधीनी बिहार प्रांतातील चंपारण्यातील मोतीहारा येथिल निळ अपारकाच्या प्रश्नावर लढा दयावा लागला.तेथे हजारो हिंदू मजूर असहयपणे जीवन जंगत होते. या मळेवाल्याकडून मोठया प्रमाणात जुलूम होत असे.त्यांच्यावरील अन्याय नष्ट करण्यासाठी गांधीजीनी चळवळ हाती घेतली. गोऱ्या मळेवाल्याच्या पाठीशी ब्रिटिश सरकार होते.महात्मा गांधीजीना चंपारण्यात जाण्यास मनाई करण्यात आली होती. ब्रिटिशाला न जूमानता त्या ठिकाणी प्रवेश केला. सरकारचा अवमान केल्याबद्दल त्यांच्यावर खटला भरण्यात आला.तेव्हा गांधीजी आपला गुन्हा केल्याचे कबूल केले आणि हा कायदा मोडला असल्याचे त्यांनी सांगितले सर्व देशभर या खटल्याची चर्चा सुरु झाली व लोकमताच्या दबावाखाली सरकारला हा खटला काढून घ्यावा लागला.या सत्याग्रहाच्या निमित्ताने महात्मा गांधीजीच्या राजकीय जीवनास खरा प्रारंभ झाला. एवढेच नाही तर या ठिकाणच्या मजूरावरील अन्याय दूर करणारा कायदाही तयार करावा लागला. या राजकीय क्षीतीजावर एका नव्या ताऱ्याचा उदय झाला.[13]

### 5) फिजी बेटातील लढा (सत्याग्रह)

महात्मा गांधीनी इ.स.1916 मध्ये प्रशांत महासागर मधील फिजी बेटात सत्याग्रहाचा पहिला प्रयोग केला.या बेटावर भारतातून मजूंर करार करुन गोऱ्या मळेवाल्याच्या शेतावर कामासाठी नेले जात होते. पंडित मदनमोहन मालवीय यांनी इ.स.1915 मध्ये लॉर्ड हार्डींगला या संदर्भात निवेदन दिले होते. पाच वर्ष ही पध्दत अशीच राहणार असे स्पष्ट केले होते. त्यामुळे गांधीजीनी मान्य करावी लागली.अतीत ही पध्दत 6 एप्रिल 1917 रोजी बंद करण्यात आली.या प्रयत्नामुळे जनतेचे लक्ष केंद्रित करणारा ठरला.[14]

### 6) गिरणी कामगारांचे आंदोलन

गिरणी कामगारांव अन्याय, अत्याचार होत होते.अहमदाबाद येथील गिरणी कामगारांचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे महात्मा गांधीनी गिरणी कामगारांच्या न्याय मागणीसाठी आंदोलन उभारुन सत्याग्रहाच्या मार्गानेच गिरणी मालकाकडून न्याय मिळवून दिला.

### 7) खेडा सत्याग्रह

महात्मा गांधी गुजरातमधील खेडा जिल्हयातील शेतकऱ्यांच्या मदतीला धावून गेले.जनता दुष्काळामुळे होरपळून निघाली असताना सरकार सारा सक्तीने गोळा करत होते.सरकारच्या विरुध्दांत गांधीजीनी सरकारला सारा न देण्याचे आदेश दिला त्यामुळे चळवळीला सुरुवात झाली. सरकारने शेतकऱ्यांच्या घरावर जफी आणली, दडपशाहीचे धोरण

आखले, लाठीचार करण्यास सुरुवात केली.कांही तुरुगात टाकण्यात आले,गांधीजीच्या नेतृत्वाखाली चळवळ चालू असल्याने सरकारला नमते घ्यावे लागले.[15]

### 8) मिठाचा सत्याग्रह

लॉर्ड आयर्विनने गांधीजीच्या मागण्या मान्य केल्या नाहीत.शेवटी साबरमती आश्रमात कॉग्रेस कार्यकरिणीची बैठक झाली व त्यात राष्ट्रीय स्तरावर सविनय कायदेभंगाची चळवळ सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला (14 फेब्रुवारी 1930) सविनय कायदेभंगाच्या चळवळीचा कार्यक्रमात महात्मा गांधीनी मिठाचा सत्याग्रह,शासकीय शिक्षणसंस्थावर बहिष्कार, परदेशी मालावर बहिष्कार, दारुबंदी,अफूची विक्री करणाऱ्या दुकानांवर निदर्शने,करबंदी,सरकारी नोकऱ्यावर बहिष्कार,जंगल कायदयाचा भंग करणे,इत्यादी बाबीचा अवलंब केला.[17] दैनंदिन गरजेच्या साध्या वस्तूंचा राष्ट्रीय स्वातंत्र्य संग्रामाशी संबंध जोडणे आम्हाला सोपे वाटत नव्हते.मात्र ही किमया गांधीनी करुन दाखविली.मिठाची गरज सर्वानाच असल्याने सर्वांनाच त्यावरील कराचा बोजा सहन करावा लागे.मिठाच्या करामुळे सामान्य माणसाचे शोषण होते म्हणून मिठावरील कर रद्द करावा अशी मागणी अनेक वर्षापासून कॉग्रेसने केली होती.12 मार्च 1930 रोजी गांधीजींनी साबरमती ते दांडी यात्रा प्रंवासाला प्रारंभ केला.गांधीजींच्या या दांडीयात्रेमुळे सर्व देशातच नवचैतन्य निर्माण झाले.गांधीजी व त्यांच्या सहकाऱ्यांनी साबरमती ते दांडी हे 241 मैलांचे अंतर 25 दिवसांत कापून 6 एप्रिलला त्यांनी अनुयायांसह मीठ उचलून कायदेभंग केला.[18]

### 9) धारसाना व वडाळा येथील सत्याग्रह

या सत्याग्रहाचे नेतृत्व सरोजिनी नायडूंकडे होते.धारासानाकडे जाणारे सर्व रस्ते सरकारने रोखले तरी तीन हजार लोकांनी तेथे 22 मे 1930 ला सत्याग्रह केला. या सत्याग्रहीवर पोलीसांनी लाठीहल्ला केला.धैर्य, निर्भयता, सामर्थ्य व संमत या सर्व गुणांचे एकत्रित दर्शन सत्याग्रहींच्या रुपाने झाले.धारसानाप्रमाणेच मुंबईत वडाळा येथील मिठागाराच्या जागी झालेल्या सत्याग्रहात 15,000 सत्यांग्रहीनी मिठाचा कायदा मोडला.गांधीजीना 4 मे 1930 लस ब्रिटिश सरकारने अटक केली.परंतु जनतेने लष्करी कायदयास जुमानले नाही. या लष्करी कायदयास विरोध करणारांपैकी मल्लप्पा धनशेट्टी, किसन सारडा, जगन्नाथ शिंदे, आणि गुर्बान हुसेन या चौघाना ब्रिटिश शासनाने फाशी दिले.[19]

### 13) सत्याग्रहाची साधने

महात्मा गांधीजींनी सत्याग्रहासाठी विविध मार्गाचा अवलंब केला. 1) असहकार, 2) सविनय कायदेभंग, 3) हरताळ, 4) उपोषण, 5) बहिष्कार, 6) हिजरत. 1920 च्या असहकार चळवळीत गांधीजींनी विदेशी वस्तूवर बहिष्कार, न्यायालयावर बहिष्कार, सरकारने दिलेली पदे-पदव्या यांचा त्याग करणे, स्थानिक स्वराज्य संस्था व कायदे मंडळावर बहिष्कार,ब्रिटिश प्रणीत शाळा-कॉलेजांवर बहिष्कार इ.कार्यक्रम जनतेपुढे ठेवला होता.कायदेभंगाचे शस्त्र यशस्वीपणे हाताळण्याचा विश्वास निर्माण झाल्यास हिंसेवर मात्र आपोआप नियंत्रण बसेल असे गांधीजी म्हणत. सभ्यता, संयम, विवेक, अहिंसा हे गुण नसलेला कायदेभंग म्हणजे निश्चित नाशच होय. चोर, गुन्हेगार, खूनी, हे कांयदयाचा भंग करीत

असले तरी ते गुन्हेगार असतात व्यापारी, विदयार्थी कामगार, शिक्षक यांनी त्यांच्यावर होणाऱ्या अन्याविरुध्द हरताळ या तंत्राचा वापर करावा असा गांधीजीनी सल्ला दिला होता.उपोषणाच्या साधनांच्या काही मर्यादा गांधीनी स्पष्ट केल्या होत्या.[21] त्यात 1) उपोषण वारंवार करु नये, 2) फळाची अपेक्षा न करता उपोषण चालू ठेवावे. 3) स्वार्थी हेतूसाठी व्यक्तिगत पातळीवर उपोषण करु नये. 4) उपोषणाचा दुरुपयोग कधीही होता कामा नये. 5) श्रध्दा, शांतता व नि:स्वार्थबुध्दी यांनीच उपोषण प्रेरित असले पाहिजे. 6) अंतिम आसरा म्हणूनच सत्याग्रंहीने उपोषण करावे. 7) उपवास करणाऱ्यांत स्वार्थ, रोष, अविश्वास, उतावीळपणा यांचा प्रवेश होता कामा नये. 8) उपवास करताना आलोट धैर्य,दृढ निश्चिय,निष्ठा,पुर्ण मन:शांती व अक्रोश इ.गोष्टी आवश्यक आहेत.इ.स.1920 व 1930 मध्ये भारतीय जनतेने शासकीय कचेऱ्या, शाळा-महाविदयालये, न्यायालये, शासकीय कार्यक्रम, कायदे, मंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, विदेशी वस्त्र इ.वर बहिष्कार टाकला होता.हिजरत म्हणजे देशत्याग (स्थलांतर) होय.गांधीजी म्हणतात,जर सारे राष्ट्र सत्याग्रह हेच आपले कायमचे शस्त्र असे ठरवील तर आमच्या सर्व हालचालींना निराळेच रुप येईल.सत्याग्रहात जेवढी राष्ट्राची सामाजिक,आर्थिक आणि राजकीय प्रगती मला दिसते तेवढी दुसरी कशातही दिसत नाही.[22]

**निष्कर्ष**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत म. गांधीचे स्थान अत्यत महत्वाचे आहे. लो. टिळकांच्या मृत्युनंतर 1920 पासून भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व गांधीजींकडे आले. त्यांच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू आहेत. स्वातंत्र्ययोध्दे, समाजसुधारक, शिक्षणतज्ञ, राजकीय विचारवंत, अस्पृश्योव्दारक, धर्मवक्ते, अर्थतज्ञ वगैरे सत्य, अहिंसा, सत्याग्रहाच्या मार्गाने त्यांनी ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुध्द दिलेला लढा हा मानव समाजाच्या इतिहासातील एक अपूर्व लढा मानावा लागेल.गांधीजीच्या राजकीय क्षितिजावर एक नेता म्हणून जो उदय झाला त्यास प्रामुख्याने गांधीजीनी प्रारंभी जे सत्याग्रह केले ते कारणीभूत होते. गांधीजींनी 'सत्याग्रह' हया त्यांच्या अहिंसेवर आधारित कार्यपध्दतीने भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले आणि त्यातच त्यांचे मोठेपणे आहे.अमेरिकेचा स्वातंत्र्यलढा व फ्रेंच राज्यंक्रांती यात हिंसा हे प्रमुख अंग होते.1917 ची रशियन राज्यक्रांती व 1949 ची चीनची राज्यक्रांती हयाही हिंसक क्रांत्याच होत्या.अहिंसक राज्यक्रांती हे भारताला गांधीजींनी दिलेले वरदान होय.गांधीजीच्या शांती-सैनिकांची लढण्यासाठीची शस्त्रे होती ती सार्थ, अहिंसा, ब्रम्हायर्च, जिभेवर नियंत्रण, अस्तेय, अपरिग्रह,स्वदेशी, निर्भयता सत्याग्रह हा शांततांपूर्ण लढा आहे. सामाजिक परिवर्तनात, गांधीजींच्या मते दोन समस्या उदभवतात.1) प्रस्थापित समाजसंस्थेत, समाजव्यवस्थेत हळूहळू बदल कसा घडवून आणायचा आहे. 2) हया प्रक्रियेत येणाऱ्या अडचणींस, विरोधास तोंड कसे दयायचे पहिल्या समष्येचा तोडगा म्हणून गांधीजींनी 'रचनात्मक' कार्यक्रम आखला तर दुसऱ्या समस्येला तोंड देण्यासाठी त्यांनी 'साभाग्रह' आदंभिला.गांधीजींच्या रचनात्मक कार्यक्रमाचे प्रमुख मुद्दे पुढील प्रमाणे हिंदु-मुस्लिम ऐक्य, अस्पृश्यता निवारण, दारुबंदी, खादीनिर्मिती केंद्राची स्थापना, ग्रामोदयोगांची वाढ, खेडयातील स्वच्छतेत सुधारणा, प्रत्येक खेडयात मूलभूत शिक्षणाचा आरंभ, संपूर्ण देशात प्रौढशिक्षणाचा प्रारंभ,स्त्री मुक्ती,स्वास्थ व आरोग्यासंबंधी शिक्षण,प्रादेशिक भाषांना महत्व व इंग्रजीला विरोध, हिंदुस्थानीला राष्ट्रभाषेचे स्थान, आर्थिक समानता, शेतकरी-संघटन, कामगार-संघटन, आदिवासी

भटक्या जमातीचे पुनर्वसन, कुष्ठरोगी-सेवा, अदाजकीय तत्वावर विदयार्थ्यांचे संघटन, गुरे-ढोरे यांच्यात सुधारणा, यातील गांधीजींच्या 'खादी' विषयक धोरणावर भरपूर टीका केली जाते.सत्याग्रहाच्या दोन महत्वाच्या पध्दती आहेत 1) उपोषण, 2) असहकार गांधीजींनी समाजाला अस्पृश्यता, देवदासी पध्दत, बालविवाह, विधवा समस्या व व्यसनाधीनता या दोषांपासून मुक्त करण्याचे प्रयत्न केले. स्त्री समाजात असलेला दर्जा उंचावण्यास गांधीजीनी आटोकार प्रंयत्न केले. गांधीजींनी त्यांच्या देशबांधवाना स्वाभिमांनाची व स्वकर्तृत्वाची जाणीव करुन दिली. सत्याग्रंहाचे मूलभूत नियम म.गांधीनी पुढील प्रमाणे प्रतिपादन केले आहे.

आणि सुधारणावादी कार्य-महिला सशक्तीकरण, स्वच्छता अभियान, दारुबंदी, स्त्री-पुरुष समानता, धार्मिक व सामाजिक सुधारणा, सर्वोदय, शांतिदूत, ग्रामराज्य संकल्पना, अस्पृश्यता निर्मूलन, सामाजिक समता शिक्षण प्रसार, निसर्गोपचार अशा अनेक अंगांनी गांधीजीच्या सुधारणवादी कार्याची ओळख होते. जाती, वर्ण, वर्गविहीन, राज्यविहीन, अहिंसात्मक समाजरचना गांधीजींना गावागावांत अपेक्षित होती.पाच पंचाच्या नेतृत्वात पंचायत राज व्यवस्था चालवावी असे त्यांना वाटत होते.आर्थिक व राजकीय विकेंद्रीकरणाचा पुरस्कार करुन गांधीजींनी लघुदयोग, कुटिरोदयोग, खादी-ग्रामोदयोग या माध्यंमातून स्वावलंबी ग्रामराज्याचे स्वप्न पाहिले.यालाच गांधीजी "वास्तंविक स्वराज्य' मानत असत.परंतु पंचायत राजव्यवस्थेचे हे गांधीजींनी पाहिलेले हे ग्रामराज्याचे स्वप्न अपूर्णच राहिले.सर्वोदय समाज या संकल्पनेतून गांधीजींनी आदर्श भारतीय ग्रामराज्याची रुपरेषा निर्धारित केली होती. विनोबा भोवे यांनी सुरु केलेली 'भूदान चळवळ' ही सर्वोदय समाजाचे आदर्श होते.दुसऱ्यांना जगविण्यासाठी जागा,हा सर्वोदयाच मुळ संदेश आहे. आत्मसंयम, शोषणरहित समाजरचना, सर्वागीण विकास, आदर्श लोकशाही शासनप्रणाली, सत्तेचे विकेंद्रीकरण वर्गविहीन, जातिविहीन, शोषणमुक्त समतावादी समाजाची स्थापना करणे हा सर्वोदयचा मुख्य उद्देश आहे.

**संदर्भ सूची**


१. जे.आर. कोकंडाकर, गाधीजी महात्मा आणि राष्ट्रपिता, भारतीय विदया भवन, मुंबई 2002 पृष्ठ 1

२. कित्ता, पृष्ठ 4

३. डॉ. पंजाब चव्हाण, प्रा. भिसे,प्रा. जवळगे, डॉ. हहेकर (संपादक), गांधी विचार निर्मल प्रकाशन, नांदेड, 2 फेब्रुवारी 2012, पृष्ठ 11

४. बाळासाहेब भारदे, गांधी विचार मीमांसा, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन, पुणे 5 ऑक्टोबर 2002, पृष्ठ 8

५. कित्ता, पृष्ठ 11

६. बाळासाहेब भारदे, गांधी विचार दर्शन सत्याग्रह विचार खंड 4 था, महाराष्ट्रं गांधी स्मारक निधी प्रकाशन, पुणे, 1994, पृष्ठ 7

७. भाऊ धर्माधिकारी (संपा), महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन, पुणे, 1995, पृष्ठ 9

८. कित्ता, पृष्ठ 17

९. कित्ता, पृष्ठ 23

१०. डॉ.भास्कर लक्ष्मण भोळे,आधुनिक भारतीय राजकीय विचार,पिंपळापूरे ॲण्ड कं.पब्लिशर्स,नागपूर,जून 2003,पृष्ठ 454

११. कित्ता, पृष्ठ 468

१२. कित्ता, पृष्ठ 469

१३. डॉ.अनिल कठारे,आधुनिक भारताचा इतिहास-(1858-1947), प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, 5 जून 2015, पृष्ठ 113

१४. डॉ. साहेबराव गाढाळ, आधुनिक भारत, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, जुलै 198, पृष्ठ 113

१५. डॉ. एस. जी. जाधव. भारताचा इतिहास, संस्कृती पुस्तकालय, नांदेड, 4 जून 2005 पृष्ठ 186

१६. डॉ. पंजाब चव्हाण, डॉ. भिसे, प्रा. जवळगे, डॉ. हहेकर (संपादक) गांधी तत्वज्ञान आणि भारतीय लोकशाही, Avon Publications Delhi,एप्रिल 2013, पृष्ठ 155

१७. प्रा.मदन मार्डीकर, आधुनिक भारताचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद जुन 1998 पृष्ठ 96

१८. कित्ता, पृष्ठ 98

१९. डॉ. जयसिगराव पवार, हिंदूस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास,कडके प्रकाशन, मे 2013,पृष्ठ 193

२०. भाऊ धर्माधिकारी (संपा), गांधी वियार दर्शन राजकारण महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, प्रकाशन, पुणे,1995 पृष्ठ 89

२१. व्यकटेश वकील (संपा), गांधी विचार दर्शन अहिंसाविचार महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, प्रकाशन, पुणे, 1994, पृष्ठ 1994, 128

२२. प्राचार्य डॉ. एस. एस. गाढाळ, भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद जून 2015, पृष्ठ 180,181

२३. रामचंद्र पाटील, महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, दोपस्तभ प्रकाशन, पुणे, जानेवारी 2020, पृष्ठ 320

२४. कित्ता, पृष्ठ 321